**CNR MHRG040006052012**

**वि.दि.मु.क्र.४५१/२०१२ मधील नि.**
**दिनांक ३१/०३/२०२२ रोजी दाखल अर्जावरील आदेश**

(श्री. तुकाराम दत्तात्रेय पाटील व इतर
विरुध्द
श्री. गणू बाळू पाटील व इतर )

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

२. सदरचा दावा हा वादीने ठरावाकरिता, निरंतर व तुर्तातूर्त मनाईहुकूमाकरिता व खरेदीखत रद्दबातल करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. दावा मिळकती हया मौजे मोहो व मोहोचापाडा या गावातील गुरे चारण्याकरिता दिलेली मिळकत आहे. सदरील मिळकत ही प्रतिवादी क्र.१९ यांना प्रतिवादी क्र.१ ते १८ यांनी खरेदीखताने विक्री केलेली आहे. सदर दावा दाखल करताना खरेदीखत क्रमांक ९१३७/२००७ असा उल्लेख केलेला होता. परंतु, दिनांक २१/११/२००७ रोजी नोंदविण्यात आलेला दस्त याचा क्रमांक ९१६७/२००७ असून सदर टंकलेखनात झालेली चूकीची दुरुस्ती करण्यासाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर वादीने अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास हरकत नसल्याचे सांगितले. सदर अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जात नमूद केलेली चूक ही टंकलेखानाची असल्यामुळे त्याची दुरुस्ती करिता अर्ज मंजूर करणे न्यायाचे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करते-

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादीने अर्जात नमूद केलेल्याप्रमाणे मुळ वादपत्रात विहित मुदतीत दुरुस्ती करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत दाखल करावी.

AVANI ASHWIN GODSE Digitally signed by AVANI ASHWIN GODSE Date: 2022.12.19 16:09:39 +0530

पनवेल {अ.अ. गोडसे}

दिनांक :१९/१२/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,पनवेल